**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रीमियम पेट्रोलच्या किंमतीत लिटरमागे सव्वा २ रुपयांपर्यंतची वाढ, व्यावसायिक ग्राहकांसाठी डिझेल २२ रुपये लिटरनं महाग

- आयकरासाठीचे नवे नियम प्रसिद्ध, १ एप्रिलपासून दिवसाला ५० हजार ऐवजी वर्षाला १० लाख रुपये बँकेत रोखीनं भरले तर पॅन आवश्यक

- अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळेल यासाठी आवश्यक कारवाई करण्याच्या केंद्र सरकारच्या सूचना

**आणि**

- बेकायदेशीर ऑनलाईन गेमिंगला आळा घालण्यासाठी सरकारकडून ३०० संकेतस्थळ आणि ॲपवर कारवाई

**<><><><><>**

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे देशात प्रीमियम पेट्रोलच्या किमतीत लिटरमागे २ ते सव्वा २ रुपयांची वाढ झाली आहे. औद्योगिक वापराच्या डिझेलच्या किमतीत २२ रुपये प्रतिलिटर वाढ करण्यात आली आहे. सर्वसाधारण पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत अद्याप कोणतीही वाढ झालेली नाही. याविषयी पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा म्हणाल्या.

**होल्ड - सुजाता शर्मा**

देशात गेल्या आठवडाभरात ११ हजार ३०० टन व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा करण्यात आल्याचं शर्मा यांनी म्हटलं आहे. एलपीजी सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजी विरोधात काल देशभरात साडे ४ हजार ठिकाणी छापे टाकण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

गेल्या २४ तासांत कोणत्याही सागरी दुर्घटनेची नोंद झाली नसून, देशाच्या सर्व नौका त्यावरचे  खलाशी सुरक्षित असल्याचं बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी सांगितलं.

<><><><><>

बँक खात्यात वर्षाला १० लाख रुपये रोख जमा केले किंवा काढले तर ग्राहकांना आता पॅन क्रमांक देणं १ एप्रिलपासून बंधनकारक असेल. सध्या ही मर्यादा दिवसाला ५० हजार रुपये इतकी आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं नव्या आयकर कायद्याच्या नियमांची अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध केली. १ एप्रिलपासून हे नियम लागू होणार आहेत. त्यात हे बदल करण्यात आले आहेत.

कुठल्याही प्रकारचं ५ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचं वाहन खरेदी करताना आता पॅन क्रमांक देणं बंधनकारक असेल. सध्या दुचाकी खरेदी करताना पॅन देण्याची गरज नव्हती.

हॉटेल, रेस्टॉरंटचे बिल, तसेच विविध सभागृहाचे भाडे देताना १ लाखापेक्षा अधिक रक्कम दिली तर पॅन क्रमांक देण्याची गरज असेल. सध्या ही मर्यादा ५० हजार रुपये आहे. घर, जमिनीचे व्यवहार करताना मालमत्तेचे मूल्य २० लाखापेक्षा जास्त असेल तर पॅन द्यावा लागेल. सध्या १० लाखापेक्षा अधिक रकमेचे व्यवहार करायचे असतील तर पॅन द्यावा लागतो.

नव्या आर्थिक वर्षात घरभाडे भत्त्यासाठी आयकरातून मिळणारी सवलत कायम असेल.  मुंबई, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईतल्या करदात्यांना ५० टक्के तर इतर शहरातल्या नागरिकांना ४० टक्के सवलत मिळेल. नव्या नियमांमध्ये या शहरांची संख्या दुप्पट करण्यात आली आहे.

घरभाड्यासाठी आयकर सवलत घेताना आता घरमालक आणि भाडेकरू यांचं नातं सांगावं लागेल. नव्या नियमांमध्ये अनेक गोष्टी सुलभ करण्यात आल्या असल्याचं प्रत्यक्ष कर मंडळानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात विविध राज्यांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालं आहे, त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेताचं विमा सर्वेक्षण करण्याचे आणि त्यानुसार आवश्यक कारवाई करण्याचे आदेश केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिले आहेत.

**होल्ड - चौहान बाइट**

चौहान यांनी आज नवी दिल्लीत वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत देशभरातील कृषी परिस्थितीचा आढावा घेतला. आगामी खरीप हंगामाचा आढावा घेण्यासाठी देशाच्या विविध भागांमध्ये प्रादेशिक पातळीवर परिषदा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसंच,शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी योग्य भाव मिळावा यासाठी किमान आधारभूत किमतीवर सुरळीत खरेदी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती चौहान यांनी दिली.

**<><><><><>**

देशातल्या शाळाबाह्य मुलांना शोधून त्यांना शाळेत दाखल करण्यासाठी सरकार लवकरच एक देशव्यापी मोहीम सुरु करणार असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंतर्गत शिशुवर्गापासून माध्यमिक शालेय शिक्षणात २०३० सालापर्यंत १०० टक्के शाळाभरतीच्या उद्दिष्टाची या मोहिमेमुळे पूर्तता होऊ शकेल. ज्या मुलांना आर्थिक, सामाजिक आणि भौगोलिक समस्यांमुळे नियमित शाळेत शिक्षण घेता येत नाही , अशा मुलांसाठी राष्ट्रीय मुक्त शालेय संस्था अर्थात  एनआयओएस ची १० हजार अभ्यासकेंद्रे देशभरात सुरु करण्याची सरकारची योजना आहे.

**<><><><><>**

एनसीईआरटी च्या जुन्या पाठ्यपुस्तकात न्याय व्यवस्थेतल्या भ्रष्टाचारासंदर्भात उल्लेख होता. त्याविरोधात केलेली याचिका दाखल करून घेण्यास आज सर्वोच्च

न्यायालयाने नकार दिला आहे. न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देण्याचा नागरिकांना हक्क असून सकारात्मक टीकेच्या बाबतीत न्यायपालिकेने अतिसंवेदनशील राहण्याची आवश्यकता नसल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने म्हटलं आहे. न्यायपालिकेतल्या भ्रष्टाचाराबद्दल पाठ्यपुस्तकातल्या उल्लेखाशी संबंधित मजकुरात सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने एक तज्ज्ञांची समिती नेमल्याची माहिती महाधिवक्ता तुषार मेहता यांनी यावेळी न्यायालयाला दिली.

**<><><><><>**

बेकायदेशीर ऑनलाईन गेमिंगला आळा घालण्यासाठी सरकारने ३०० बेकायदेशीर जुगारी खेळांच्या संकेतस्थळांना तसेच ऍप्सना ब्लॉक केलं आहे. सट्टा आणि मटक्याचे जुगार तसंच कॅसिनो गेमिंग उपलब्ध असलेल्या इतर अनेक संकेतस्थळांवरही कारवाई करण्यात आल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयातल्या सूत्रांनी म्हटलं आहे. आतापर्यंत अशा ८ हजार ४०० संकेतस्थळांना ब्लॉक करण्यात आलं असून ऑनलाईन गेमिंग विरोधातला कायदा आल्यानंतर त्यातील बहुसंख्य संकेतस्थळांवर कारवाई करण्यात आल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळं सर्वांसाठी खुलं करण्यासाठी केलेल्या सत्याग्रहामुळे केवळ महाराष्ट्राचाच नाही तर देशाचा इतिहास बदलला. या सत्याग्रहाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी देशात समतेची मुहुर्तमेढ रुजवली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाड इथं केलं.

चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाला आजपासून सुरूवात झाली. यावेळी चवदार तळे जल शुद्धीकरण प्रकल्प आणि परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले....

**होल्ड बाईट- मु◌ुख्यमंत्री**

याच कार्यक्रमात जातीय अत्याचारांमुळे मृत्यू झालेल्यांच्या वारसांना थेट शासकीय सेवेतल्या नियुक्तीपत्रांचं वितरण प्रातिनिधिक स्वरुपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. चवदार तळ्याजवळच्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येनं जनसागर लोटला होता. बाबासाहेबांच्या पुतळ्यावर आज सकाळी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

<><><><><>

नाशिकचा स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याने एका महिलेवर केलेल्या कथित बलात्काराची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करावी अशी विनंती करणारं पत्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांना लिहिलं आहे. आरोपीकडे सापडलेल्या ५८ आक्षेपार्ह चित्रफितींमधल्या महिलांनी भयमुक्त होऊन तक्रारी दाखल कराव्यात यासाठी त्यांची ओळख गुप्त ठेवून त्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावं, आरोपीने डिजिटल पुरावे वापरून पीडितांचे ब्लॅकमेलिंग केलं असल्यास त्याच्यावर वाढीव कलमे लावावीत, तसेच हा तपास ठराविक काळात पूर्ण करून न्यायालयीन कारवाई सुरु करावी अशी मागणी या पत्रात त्यांनी केली आहे.

<><><><><>

बंगालच्या विधानसभा निवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसने आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात सध्या सुरू असलेल्या कल्याणकारी योजनांची व्याप्ती वाढवणं, महिलांसाठीच्या लक्ष्मी भांडार योजनेद्वारे दिल्या जाणाऱ्या रकमेत ५०० रुपयांची वाढ, राज्यातल्या प्रत्येक तालुक्यात आरोग्य शिबिरं आणि पायाभूत सुविधांचा विकास यांसारखी आश्वासनं देण्यात आली आहेत. युवा तसंच सामाजिक कल्याण आणि कृषी क्षेत्रावरही या जाहीरनाम्यात विशेष भर देण्यात आला आहे.

<><><><><>

जगभरातली पर्यटन स्थळं, बगिचे आणि इतर ठिकाणी शत्रु देशांमधल्या नागरिकांवर हल्ला करण्याचा इशारा इराणनं दिला आहे. इराणच्या सरकारी दूरचित्रवाहिनीद्वारे लष्कराच्या प्रवक्त्यानं ही धमकी प्रसारित केली आहे. आखाती देशांमधल्या तेल आणि नैसर्गिक वायूंच्या साठ्यांवरचे हल्ले इराणनं कायम ठेवली आहे.

//<><><><><>//